युनिट 1

अ) आधुनिक भारताचा इतिहास (1885-1947)

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना

ब) मवाळ राजकारणाचे स्वरूप (1885-1905)

क) जहालवादाचे उदय आणि विकास (1905-20)
(बाळ टिळक)

युनिट 2

अ) असहकार चळवळ

ब) सविनय कायदेभंग चळवळ

क) चलेजाव चळवळ (16m)

युनिट 3

अ) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची

ब) क्रिप्स मिशन

क) कॅबिनेट मिशन योजना

c टि.

Scanned with CamScanner

Unit 4

अ) सुभाष चंद्र बोस, आजाद हिंद सेना

ब) मांऊट बॅटन योजना 8 m

क) भारतीय स्वातंत्र्य कायदा

Famous
Page No.:
Date.:

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना ⇒

ब्रिटिश कालीन भारतात पाश्चात्य शिक्षणात शिकलेल्या भारतीय सुशिक्षितांना इंग्रजी भाषा कळायला लागली. या भाषेमुळे जागतिक घडामोडीविषयी माहिती प्राप्त होऊ लागली. फ्रान्सची राज्यक्रांती अमेरिकेची क्रांती, जर्मनीचे एकीकरण या घटनामागील विचार भारतीयांना कळू लागले. ~~फ्रान्सची राज्यक्रांती~~ राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय या संकल्पनाशी भारतीयांचा संबंध येऊ लागला. युरोपात इटली व जर्मनी मध्ये राष्ट्रवादाची चळवळ भारतीयांना प्रभावित करित होती.

इ.स 1857 च्या उठावात इंग्रजांनी भारतीयांचे बंड (विरोध) मोडून काढला. इंग्लंड हे प्रगत राष्ट्र असून व स्वरक्ष राष्ट्र असून शस्त्राच्या आधारावर आपण इंग्लंडला कधी ही जिंकू शकत नाही. यांची जाणीव सुशिक्षित भारतीयांना होती. त्यामुळे त्यांनी हिंसात्मक मार्गाने नव्हे तर कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन परकिय जुल्मी राजवटी विरोधात राष्ट्रवादी व स्वातंत्र्याची चळवळ सनदशील मार्गाने करावी याचा स्वीकार केला. भारतात अनेक राजकीय सामाजिक व धार्मिक संघटना सुरु झालया.

न्युरल्यू इंग्लंड अधिकारी एलन ह्युम यांनी भारतीयांना इंग्रजी राजकीय विरोधात विद्रोह व बंड करुन हे

तर भारतीयांच्या मागण्या व भारतीयांची मनोगती इंग्रज सरकारला कळविले पाहिजे त्यासाठी राष्ट्रव्यापी संघटन निर्माण करण्याचा विचार ह्युम च्या डोक्यात सुरु होता. त्यांनी काही भारतीय नेत्यांशी चर्चा करुन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ची स्थापना करण्याचे ठरविले. २८ डिसेंबर १८८५ ला मुंबई येथील गोकुळदास तेजपाल संस्कृत महाविद्यालयात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अधिवेशन भरविण्यात आले. या अधिवेशनाला दादाभाई नौरोजी, फिरोजशाह मेहता, गोपालकृष्ण गोखले, न्यायमूर्ती रानडे, बॅरिस्टर जयकार, मदन मोहन मालवीय आणि व्योमेशचंद्र बॅनर्जी हे पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. या अधिवेशनाला संपूर्ण भारतातून 72 प्रतिनिधींनी भाग घेतला. अधिवेशनात सहभागी नेतृत्व इंग्रजी प्रशिक्षणाची एकनिष्ठ असून त्यांच्या ब्रिटिश न्यायबुद्धीवर विश्वास होता. कायद्याच्या चौकटीत राहून लोकांच्या मागण्या शासनाला पोहोचविणे हेच मर्यादित उद्देश्य या नेत्यांचा होता. शासनाला अर्ज व विनंती द्वारे आपल्या मागण्या सादर करणे व शासनाने त्यावर कारवाई करावी, यासाठी प्रयत्न करणे असे मवाळ स्वरूप भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे होते.

Scanned with CamScanner

## मवाळ राजकारणाचे स्वरूप ⇒

प्रस्तावना ⇒ पाश्चात्य शिक्षणामुळे सुशिक्षित भारतीयांना राष्ट्रवाद हि संकल्पना कळायला लागली. शस्त्राच्या आधारे आपण बलाढ्य इंग्रजी सत्तेचा सामना करू शकत नाही. त्यामुळे भारतीयांना प्रबोधित करून जागृत करून व संघटित करून इंग्रजी सत्तेविरोधात चळवळ सुरू करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना करण्याचा विचार पुढे आहे. संविधानिक व कायदेशीर पद्धतीने ब्रिटिश सत्तेचा विरोध करणे हा विचार पुढे आला. २८ डिसेंबर १८८५ ला राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना करण्यात आली. यामध्ये दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, गोपाळकृष्ण गोखले, न्यायमूर्ती रानडे, बॅरिस्टर जमकार, मदन मोहन मालवीय इत्यादी नेत्यांनी यात भाग घेतला.

हे सर्व नेते इंग्रजी राजपद्धतीशी एकनिष्ठ असून त्यांच्या ब्रिटिशांच्या न्यायबुद्धिवर विश्वास होता. सनदशीर मार्गाने लोकांच्या मागण्या सरकारला सादर करणे हि मवाळांची भूमिका होती. मवाळांना ब्रिटिश साम्राज्यतच राहूनच आंदोलन करायचे होते, याकरिता अर्ज व विनंती या साधनाचा वापर केला. ब्रिटिशांच्या लोकशाही प्रणालीवर विश्वास ठेवणे हा त्याच्या मुख्य उद्देश होता. मवाळांची कार्यप्रणाली सभा आयोजित करणे, पत्रके वाटणे, सरकारला लोकांच्या मागण्या सादर करणे,

Scanned with CamScanner

चर्चा करून प्रस्ताव पारित करणे हा सरकारला सादर करणे अशी कार्यप्रणाली स्वीकारलेल्या गेली.

मवाळ राजकारणाचे स्वरूप ⇒

ब्रिटिशवादीच्या काळातील काँग्रेस नेत्यांची कार्यप्रणाली व इंग्रजी प्रशासनाविषयी भूमिका मवाळ स्वरूपाची होती.

① ब्रिटिश प्रशासन वरदान भारताकरिता वरदान ⇒

मवाळ नेत्यांच्या ब्रिटिश शासनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन उदार होता. मवाळ नेत्यांना ब्रिटिश प्रशासन भारतीयांसाठी वरदान वाटत होते, कारण इंग्रज भारतात येण्यापूर्वी भारतात एकसंधता नव्हती. देश धर्म वर्ण व जाती मध्ये विभाजीत होता. सर्वत्र अराजकता पसरली होती. समाजात अनेक कुप्रथा प्रचलित होत्या. स्त्रीशुद्र अस्पृश्य- त्यांचे अधिकार हिरावून घेण्यास आले होते. भारतात लोकशाही कायद्याचे राज्य आधुनिकरण, औद्योगिक विकास, दळणवळण साधनांचा अभाव इत्यादी क्षेत्रात भारत फारच मागासलेला होता. परंतु इंग्रजी राजवटीत यासर्व क्षेत्रावर भर देण्यात आले. त्यामुळे भारत आधुनिकतेकडे वाटचाल करू लागला. आहे असे मवाळांना वाटत होते.

② ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवर विश्वास ⇒

मवाळ नेत्यांना ब्रिटिशांच्या न्याय प्रियतेवर अढळ विश्वास होता. जेम्स

मोर्ली, ब्राईट स्पेन्सर यासारख्या उदारवादी ब्रिटिश तत्वज्ञांची विचार प्रणाली आत्मसात केल्यामुळे ब्रिटिश तत्वज्ञांची लोक हे उदार आहेत. न्यायप्रिय आहेत इंग्लंड हिच लोकशाहींची मातृभूमी आहे. ते भारतातही लोकशाही विकास करतील असा मवाळांची समज होता. राष्ट्रीय कॉंग्रेस मध्ये काम करणारे बरेच मवाळ नेते आंग्लशिक्षित असून अनेकपणा इंग्लंड मध्ये जाऊन आले. त्यांच्या इंग्लंडच्या राणीच्या जाहिरनाम्यावर अढळ विश्वास होता. ब्रिटिशांच्या कृपाछत्राखालीच प्रगती होईल. हा त्यांचा समज होता. ब्रिटिश सत्तेच्या भारतीयांना स्थानिक प्रशासनाचे अधिकार मिळावे अशी मवाळांची अपेक्षा होती. त्यामुळे मवाळ नेत्यांनी ब्रिटिश प्रशासनाशी सहकार्याची भूमिका ठेवली.

③ मवाळ नेत्यांचे पूर्ण स्वराज्य लक्ष नव्हते → राष्ट्रीय कॉंग्रेस नेते भारताला पूर्ण स्वराज्य मिळावे, इंग्रजाने देश सोडून निघून जावे. हा उद्देश नव्हता. गोपाळकृष्ण गोखलेंना भारताला अधिराज्याचा दर्जा मिळावा असे वाटत होते. त्यांना ब्रिटिशांसी संबंध तोडावयाचे नव्हते. जगात भारताला औद्योगिक साहित्यीक कला व विज्ञान या क्षेत्रात प्रगती करावयाची असेल तर हे सर्व होण्याकरिता भारतावर ब्रिटिश सत्ता असणे आवश्यक आहे, असे मवाळ नेत्यांना वाटत होते. आणखी काहीकाळ तरी भारताच्या विकासाकरिता इंग्रजी प्रशासन आवश्यक असल्याचा समज मवाळांचा होता.

Scanned with CamScanner

Page No.:
Date.:

④ इंग्रजांच्या संविधानिक प्रक्रियेवर विश्वास होता ⇒

राष्ट्रीय काँग्रेसमध्ये काम करणाऱ्या मवाळ नेत्यांना इंग्रजांच्या संविधानीक प्रक्रियेवर अगाढ श्रद्धा होती. कारण इंग्रजी राजवटीतच अनेक कायद्यांच्या माध्यमातून संविधानीक विकासाच्या प्रक्रियेला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली होती. लोकशाही प्रक्रियेची भारताला ओळख माहिती नव्हती. इंग्रजी राजवटीत 1772 च्या 1784 च्या 1813 च्या 1833 च्या 1858 च्या व 1861 च्या कायद्या पारित करण्यात आले. या कायद्याने भारताच्या संविधानीक प्रक्रियेला सुरुवात झाली होती. त्यामुळे मवाळ नेत्यांना संविधानिक पद्धतीने आपल्या समस्यांची जाणीव इंग्रजांच्या करून दिल्यास इंग्रज निश्चितच ते भारतीयांना हिताच्या निर्णय घेतील.

⑤ हिंदू मुस्लिम एकतेवर भर ⇒

मवाळवादी नेत्यांना हिंदू मुस्लिम एकतेचे महत्व समजले जाते. मवाळांच्या मते जर भारतीय धर्माच्या आधारे विभाजीत राहले तर भारताचे भवितव्य अंधकारमय राहिल जर हिंदू आणि मुस्लिम परस्परांवर बंधुत्व आणि धार्मिक संयुक्त समता ठेवून सहकार्य केले दोघांनीही आंदोलने केली तर याचा निश्चितच सकारात्मक परिणाम भारताच्या हिताच्या असेल दोघांनी मिळून लढल्यावर आंदोलनाला आणखी बळ प्राप्त होईल.

Scanned with CamScanner

Famous
Page No.:
Date.:

⑥ पाश्चात्य शिक्षा भारतीयांसाठी उपयुक्त आहे यावर विश्वास ⇒

मवाळवादी नेते पाश्चात्य शिक्षणाला भारताच्या विकासाकरीता होते आणि वरदान होते. पाश्चात्य शिक्षण भारतीयावर अंधश्रद्धा, अंधश्रद्धा, व कुप्रथा पासून मुक्त करू शकले. आणि मानवावर मुल्य व वैज्ञानिक दृष्टिकोन स्विकारणारे पाश्चात्य शिक्षण खरा अर्थाने या विषय मवाळांमध्ये प्रचंड आत्मविश्वास होता. इंग्रज सरकारने भारतीयांना पाश्चात्य शिक्षण देऊन स्वतासाठी क्षेत्र निर्माण केला.

विदेशातील भारतीयांना माहिती असते. स्वतंत्र बंधुता समता या संकल्पना या शिक्षणाकडे भारतीयांना समजाये.

⑦ देश प्रेमाला महत्त्व दिले ⇒

मवाळवादी नेत्यांनी धर्म, जात, पंथ, भाषा, प्रांत आणि विविध परंपरा असलेल्या भारतीयांना एकात्म निर्माण करण्यासाठी त्यांना जागृत व संघटित करण्यासाठी देश प्रेमाचे महत्व मवाळवादी ओळखून होते. भारतीयांनी एकात्मा बांधायचे होते. त्यामुळे मवाळांनी देशसेवा, नैतिकता, सदाचार, कठोर, परिश्रम इत्यादि बाबींना महत्त्व दिले.

Scanned with CamScanner

Page No.:
Date.:

④ राजकारणाचे आध्यात्मीकरण ⇒

मवाळवादी नेत्यांनी राजकारण करतांना छल कपट इत्यादि वैध असे कधीही केले नाही. ते इंग्रजांविरुद्ध षड्यंत्र करण्यास इंग्रजांना दगा देण्यास व विश्वास भंग करण्याच्या मवाळवादी नेते साध्य जेवढे पवित्र मानत असे ते साध्य प्राप्त करण्याचे साधनही पवित्र असायला पाहिजे यावर मवाळवादी नेत्यांचा दृढ विश्वास होता. स्वतःसाठी राजकारणाचा उपयोग न करता देशसेवेसाठी ते प्रसंगी आपल्या सुखी संसाराला आहुती देवून तुरुंगात जायला मागे पुढे पाहत नव्हते. धार्मिक व सांस्कृतिक आवरणातून राष्ट्रवाद जागरूक करण्यावर त्यांचा विश्वास होता.

⑤ लोक मताला प्राधान्य ⇒

मवाळवादी नेत्यांनी राष्ट्रीय चळवळ करतांना लोकमताला वेळोवेळी महत्व दिले आहेत. इंग्रजी प्रशासनाविषयीची लोकांमधील भीती दूर करण्याचा प्रयत्न मवाळवादी नेत्यांनी केला. भारतीयांना राष्ट्रीय चळवळीची महत्व समजावून सांगण्यावर मवाळांच्या भर जोर होता. मवाळांनी जनमताला प्रभावित करण्यावर जोर दिला. ब्रिटिशासोबत करण्याकरिता जनमताला संदर्भ देवून सुधारणेला महत्व दिले.

10) आदर्शवादी व यथार्थवादी निती ⇒

मवाळांची निती आदर्शवादी व यथार्थवादी होती. एकीकडे ते भारताला ब्रिटिश साम्राज्याचा भाग म्हणून स्विकारतात. तर दुसरीकडे स्वराज्याची किंवा स्वशासनाची विचार करतात. सशस्त्र क्रांतीद्वारे आपण इंग्रजी सत्तेचा सामना करु शकत नाही. त्यामुळे सदनशील मार्गाचा स्वीकार करण्यात आला.

★ मवाळवादी राजकारणाचे योगदान ⇒

मवाळवादी राजकारणाने पहिल्यांदा भारतीय लोकांना जागृत व संघटीत करण्यावर जोर दिला. भारतीयामधील विविध भेदा बाजूला करुन टाकला व बंधुत्वाच्या भावनेने एकत्र आणले. इंग्रजी शासनाविरुद्ध संघर्ष करण्यास भारतीयांना प्रेरीत केले. भारतीयामध्ये राष्ट्रप्रेम जागृत केले. भारतीयामध्ये देशसेवा व देशप्रेम जागृत केले.

(i) जनमानसांना जागृत करण्याला प्राधान्य दिले.
(ii) सशस्त्र मार्गाने नाही तर सदनशील मार्गाने चळवळ कामावर भर दिला.
(iii) मवाळांनी भारतीय जनमानसाच्या प्रश्नाचे विनीकरण करण्याचा प्रयत्न केला.
(iv) भारतीयांना प्रशासनात सहभागी करण्याचा प्रयत्न केला.
(v) भारताचे खोटे आर्थिक शोषण उजागर केले.
(vi) स्वातंत्र्य प्राप्तीसाठी उत्तु वातावरण तयार केले.
(vii) मवाळांच्या राजकारमुळेच १८९२ व 1909 चा कायदे पास केले

Scanned with CamScanner

# जहालवादाच्या उदयाची कारणे

प्रस्तावना ⇒

इ. स १८९३ पासून कॉंग्रेस मध्ये जहालवादी विचारांचा उदय होऊ लागलेला होता. मवाळांच्या ध्येय व उद्देशाप्रती तसेच कार्यप्रणाली विषयी कॉंग्रेस मधील एका गटात नाराजगी व असंतुष्टता होती. अशातच ब्रिटिश प्रशासनाची दडपशाही मवाळांच्या मागण्यांना ब्रिटिशांकडून पायदळीत उडवणे यामुळे एक मोठा वर्ग इंग्रजांवर नाराज होता. मवाळांनी सादर केलेल्या मागण्यांची सरकार दखल घेत नव्हते आणि मवाळ नेते प्रतिक्षा करण्याचा सल्ला देत होते. हा विचार तरुणांना पसंद नव्हता. तर जुलमी ब्रिटिश राजवटीला कोंडीत पकडून आपल्या मागण्या पूर्ण करायला भाग पाडावे असा तरुणांचा एक गट होता. देशाला वक्तृत्वाची नाही, तर प्रत्यक्ष कृतीची गरज आहे. हा विचार पुढे येऊ लागला.

याच काळात देशात पडलेले दुष्काळ व महामारी यामुळेही नाराजीत वाढ झाली. इंग्रजांनी भारतीयांची केलेली आर्थिक पिळवणूक भारतीयांची दडपशाही व कर्झनने केलेली बंगालची फाळणी यामुळे जहाल विचाराला प्रेरणा मिळाली. तसेच लाल, बाल, पाल या सिंहांनी जहालांना प्रेरित केले.

Scanned with CamScanner

## जहालवादाच्या उदयाची कारणे

① इ. स 1892 च्या असंतुष्ट कायदा ⇒

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनामध्ये पारीत केलेल्या प्रस्ताव ब्रिटिश सरकारला सादर करण्यात आले. या मागण्यावर इंग्रज सरकार निश्चित पूर्ण करेल असा आशावाद मवाळवादी नेत्यांचा होता. ब्रिटिश सरकारनेही इ. स 1892 च्या भारतीय कॉन्सील च्या कायदयाची घोषणा केली. परंतु या कायदयाने मवाळाच्या मागण्या पूर्ण करण्यात आलेला नव्हता. मवाळ नेते त्यामुळे ~~अंसतु~~ असंतुष्ट होते. मवाळांनी मांडलेल्या ठरावाच्या सदनशील मार्गांनी केलेल्या आंदोलनाच्या व मवाळाच्या मागण्याच्या इंग्रजांनी आजीबात या कायदयात विचार केलेला नाही. त्यामुळे कॉंग्रेस मधील तरुणा मध्ये मवाळाच्या कार्यप्रणालीवर असंतोष होता. त्याचीच परिणीती जहालवादाच्या उदयात झाली.

② आर्थिक शोषण ⇒

भारतात स्थापन झालेल्या इंग्रजी सत्तेने भारतीयांची अनेक प्रकारे पिळवणूक केली. कृषीचा (शेतीच्या) व्यापारीकरणामुळे शेतीवरील अतिरिक्त करामुळे शेतकरी नाराज होता. मजुरांना दिले जाणारे अपुरे वेतन अतिरिक्त कामाचे तास व कोणतेही सुरक्षा नसल्याने मजुर वर्ग नाराज

होता. व्यापारासाठी इंग्रज व्यापारी व भारतीय व्यापारी यांच्यातील करांचे प्रमाण असमान होते. देशातील लघु व कुटीर उद्योगांचा झालेला ऱ्हास यामुळेही अनेकजण नाराज होते. शेतकऱ्याकडून अतिशय अल्पदराने त्यांच्या माल विकत घेऊन त्यांच्याकडून प्रक्रिया करून दाम दुप्पट भावाने विकल्या जात असे भारतीयांवर प्रचंड आर्थिक कर आकारले गेले दादाभाई नौरोजी, रमेशचंद्र दत्त यासारख्या विचारवंतानी इंग्रजी सत्तेचा होणाऱ्या आर्थिक शोषणाचे दर्शन घडविल्याने जहालवादाच्या प्रसाराला चालना मिळाली.

## ③ इ. स. 1857 मधील दुष्काळ व महामारी ⇒

इ. स 1857 मध्ये भारतात अनेक जागी भयंकर दुष्काळ पडला. या दुष्काळात जवळपास २ करोड लोकांना त्यांची झळ पोहचली. हा दुष्काळ 70 हजार वर्गमैल क्षेत्रफळावर पसरलेला होता. पण सरकारला यांचे काही घेणे देणे नव्हते. सरकारच्या या धोरणामुळे लोकांची नाराजी होती. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात महामारी पसरली. पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला. प्लेगची निर्मूलन करण्यासाठी रँड नावाच्या अधिकाऱ्याची निवड झाली. रँडने प्लेग निर्मूलनाची नावाखाली भारतीयांना घराबून प्लेग नष्ट व्हावा याकरिता प्लेग ग्रस्त लोकांना बळजबरीने शहराबाहेरील कॅम्प मध्ये ठेवण्यात आले. घर जाळ्याला फेताळून प्ल

चाफेकर बंधूंनी रँड्स्या खून केला. तर टिळकांनी सरकारचे डोके ठिकाणावर आहे का हा लेख लिहिला. परिणामी जहालांच्या उदय झाला.

## (4) आक्रमक हिंदुत्वाच्या पुरस्कार ⇒

मवाळांच्या धैर्य व कार्यप्रणालीवर कॉंग्रेसमधील एक गट नाराज होता. हिंदू मुस्लिम एकतेच्या व सहनशील मागण्या हा गट विरोधात होता. कॉंग्रेसमधील एका गटाने जनमानसाची धार्मिक भावना घेवून आक्रमक राष्ट्रवादाचा विचार मांडायला सुरुवात केली. हिंदूधर्म धोक्यात असून धर्मरक्षणाच्या समोर यावे. भारतीयांच्या धार्मिक भावनांना चेतविण्यासाठी स्वामी दयानंद सरस्वती, बाळ गंगाधर टिळक, स्वामी विवेकानंद यांनी आक्रमण हिंदुत्वाच्या तिरस्कार केला. टिळकांनी शिवजयंती व गणेश उत्सव सुरु केले. वरुन हिंदूला संघटित केले. परिणामी जहालविचारांच्या उदय झाला.

## (5) सुशीक्षित वर्गात असंतोष ⇒

भारतीय जनमानसात मवाळांच्या कार्यप्रणाली विषयी धैर्य धोरणाविषयी व इंग्रज सत्तेपुढे पत्करले शरणागतीमुळे तसेच इंग्रजांच्या दडपशाहीमुळे, आर्थिक शोषणामुळे सुशिक्षित वर्गामध्ये प्रचंड क्षोभ होता. मवाळांच्या मागण्या कडे इंग्रजांनी केलेले दुर्लक्ष, 1852 चा कायदा या बाबींमुळे

सुशिक्षित वर्गात असंतोष होता. त्याचीच परिणीती पुढे जहालवादाच्या उदयात झाली.

⑥ **आंतरराष्ट्रीय घडामोडींचा प्रभाव / परिणाम ⇒**

विदेशांमध्ये घडत असलेल्या घटनांमुळे जहाल राष्ट्रवादाला प्रेरणा मिळाली. रशिया जपान युद्धात छोट्याश्या जपानने विशाल रशियाचा पराभव केला. एक छोटासा देश मोठ्या देशाचा पराभव करु शकतो तर आपणही इंग्रजांचा पराभव का करु शकत नाही. आयरलँड मधील ब्रिटिश विरोधी आंदोलन चीनमधे इंग्रजाविरुद्ध झालेले बक्सरचे बंड या घटनांनीही तरुण भारतीयांना प्रेरणा मिळाली. संघटित होऊन इंग्रजांना भारतातून जाण्यास बाध्य करु शकतो व स्वतःच्या बळावर देशाची प्रगती करु शकतो. हा विश्वासच जहालवादाच्या उदयाला कारणीभूत ठरला.

⑦ **लॉर्ड कर्झनचे प्रतिगामी धोरण ⇒**

इ.स. 1898 ते 1905 या काळात कर्झनने भारतीयांची मुस्कट दाबी दडपशाही केली. कर्झनने स्थानीय स्वराज्य संस्थेवर शासनाचा अधिकार वाढविला. शिक्षण क्षेत्रात सरकारी हस्तक्षेप केला. भारतात भयंकर दुष्काळ पडला असतानांही कर्झनने शेतसारा वसुली सुरुच ठेवली. त्याने दिल्ली येथे दरबाराचे

आयोजन करून पाण्यासारखा पैसा खर्च केला. याचा भारतीयांवर गंभीर परिणाम होऊन इंग्रजी शासनाविरुद्ध आंदोलन करण्यासाठी जहालवाद्यांचा उदयास कारणीभूत ठरली असेच कर्झनच्या काळात झालेली बंगालची फाळणी हे सुद्धा जहालवाद्यांच्या उदयाची महत्वाचे कारण बनले.

④ **जहालांची वैचारिक भूमिका** =>

साम्राज्यवादी आणि जुलमी राजसत्तेविरुद्ध लढण्यासाठी शासना सोबत एकनिष्ठ राहणे चुकीचे आहे. जुल्मी सत्तेला कोंडीत पकडण्यासाठी व त्यांच्या प्रभावातून जनतेला मुक्त करण्यासाठी जनतेने सत्याग्रहाच्या व संघर्षाच्या माध्यमातून इंग्रजांवर दडपण आणावे वृत्तपत्रातून सरकार विरोधी भावना चेतवावी. टिळकांनी चतुःसूत्री देऊन यानेच देशाला स्वातंत्र्य मिळेल हा विचार प्रसारित केला. जहालांनी लोक जागृतीची चळवळ उभी करण्याला प्राथमिकता / जोर दिल्याने जहालांचा उदय झालयाचे दिसून येते.

⑤ लाल बाल पाल यांचे नेतृत्व =>

लाला लजपतराय बाळ गंगाधर टिळक आणि बिपिनचंद्र पाल या तीन नेतृत्वाचे पंजाब, महाराष्ट्र, बंगाल या तीन प्रदेशामध्ये या तीन्ही नेत्यांनी मवाळांच्या कार्यप्रणाली वर ध्येयधोरणावर व नेतृत्वावर टिका करून

Scanned with CamScanner

आक्रमक राष्ट्रवादाचे समर्थन केले. या तिघांनीही आपआपल्या प्रदेशात जहाल विचारांचा पुरस्कार केला. त्यांनी इंग्रजांचे गोडवे न गाता इंग्रजा विरुद्ध व्यापक चळवळ उभारणीला महत्त्व दिले. या तीन्ही नेत्यांनी वृत्तपत्रातून जहाललेखन केले, त्यामुळेच जहालवादाचा उदय झाला.

(10) मवाळांच्या धोरणाबाबत व कार्यप्रणालीबाबत संशय ⇒

मवाळांनी इंग्रज सत्तेला वरदान मानून इंग्रजांच्या न्यायप्रियतेवर न्यायबुद्धीवर विश्वास ठेवला. अर्ज व विनंत्या करून सरकारला वारंवार निवेदने दिली. व सनदशीर मार्गाने इंग्रजांशी सहकार्य करून इंग्रज भारतीयांचे निश्चितच कल्याण करतील असा पक्का विश्वास मवाळ गृहित धरत होते. परंतु जहाल नेत्यांनी मवाळांच्या या ध्येयधोरणाबाबत व कार्यप्रणालीबाबत भारतीयामध्ये एक असंतोष निर्माण करण्याचे काम केले. त्यामुळेच जहालवादाच्या उदयाला चालना मिळाली.

Scanned with CamScanner

Famous
Page No.:
Date.:

असहकार चळवळीच्या कार्यक्रमाविषयी माहिती द्या ?

1) असहकार चळवळीची पार्श्वभूमी ⇒

बाळ गंगाधर टिळकांनी स्वराज्याच्या अधिकारासाठी होमरूल चळवळ सुरू केली. या चळवळीच्या माध्यमातून स्वराज्याकरिता इंग्रज सरकार वर दबाव टाकण्यास आल्या. टिळकांची ही होमरूल चळवळ दडपून टाकण्यासाठी इंग्रजांनी रौलेट कायदा 30 मार्च 1919 ला पास केला. ज्यादिवशी हा कायदा पास झाला तो दिवस काळा दिवस म्हणून देशभर पाळण्यात आला.

2) रौलेट कायदा ⇒

राष्ट्रीय चळवळ दडपून टाकण्यासाठी इंग्रज सरकारने क्रांतीकारी संघटनावर आळा घालण्यासाठी डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट तयार केला. भारतीयांच्या राजद्रोही कृतीला थांबविण्यासाठी सरकारने रौलेट या न्यायधिशाच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. समितीने दिलेला अहवालाच्या आधारे इंग्रजांनी दोन विधेयक विधीमंडळात मांडून रौलेट कायदा पास केला.

या कायद्यामुळे नागरिकांच्या मुलभूत अधिकारांवर गदा आणण्यासाठी केंद्र व प्रांतीय सरकारला संशयित व्यक्तीला कारण न सांगता अटक वारंट न काढविता अटक

करण्याच्या खटल्या न भरता कितीही दिवस तुरुंगात कैद ठेवण्याच्या अधिकार देण्यात आला या सरकारच्या दडपशाहीविरुद्ध गांधीनी चेम्स फोर्ड ला पत्र लिहून सत्याग्रहाची सूचना दिली. सत्याग्रह सभेची स्थापना करण्यात आली. या सभेत गांधीजी सरोजिनी नायडू, स्वामी श्रद्धानंद, हकीम अजमल खान इत्यादींनी 6 एप्रिल 1919 आंदोलन सुरु करुन रौलेट कायदा रद्द करण्याची मागणी केली. इंग्रजांनी गांधीला दिल्लीला जात असतांना 7 एप्रिल 1919 ला अटक केली. त्यामुळे देशभर संतप्त हरताळ व निषेध सभा आयोजित झाला. हिंदु मुस्लिम एकतेमुळे सरकार अस्वस्थ झाली. पुढे जालियनवाला बाग हत्येमुळे मागे घेण्यात आले.

3) **जालियनवाला बाग हत्याकांड** →

6 एप्रिल 1919 ला रौलेट कायद्याविरुद्ध पंजाब मध्ये चळवळ सुरु झाली. इंग्रजांनी आंदोलकांच्या छळ केला. 6 एप्रिल 1919 ला इंग्रजांनी डॉक्टर की च्यालू आणि डॉ. सत्यपाल यांना अटक करण्यात आली. अज्ञात ठिकांनी कैद केले. 7 एप्रिलला हजारो लोकांनी मोर्चा काढून या नेत्यांच्या सुटकेची मागणी केली. परंतु सरकारने गोळीबार केल्यामुळे संतप्त झालेल्या जमावाने बँक, चर्च टेलिफोन व नगरपालिकेच्या कार्याला हल्ला करुन जाळतोडफोड केली. जनरल डायरने सभा व मिरवणूकीवर बंदी घातली. परंतु

हि माहिती लोकांपर्यंत पोहचू दिली नाही.
13 एप्रिल 1919 ला जालियनवाला बाग सभेत गोळीबार केला. यात शेकडो जन मृत्यू पावले. संपूर्ण पंजाबात संचार बंदी व भिरक सुरु झाले. रविंद्रनाथ टैगोरांनी सरपदवीचा त्याग केला. गांधीजींनी असहकार चळवळ सुरू करण्याचे जाहिर केले.

4) **असहकार चळवळीचा प्रस्ताव** ⇒ गांधीजींनी असहकाराची चळवळ सुरु करण्याचा घेतलेल्या निर्णयावर विचार करण्यासाठी 4 सप्टेंबर 1920 ला कांग्रेसचे विशेष अधिवेशन कोलकाता येथे लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या अधिवेशनात असहकाराचा ठराव मांडला. हा ठराव 1886 विरुद्ध 884 मतांनी पास झाले. पारित झालेल्या ठरावाला डिसेंबर 1920 ला नागपूर येथे आयोजित कोंग्रेसच्या अधिवेशनात स्वीकार मतब करण्यात आले. या अधिवेशनाचे अध्यक्ष विजया राघवाचारी हे होते. तर स्वागताध्यक्ष जमनालाल बजाज हे होते. यात चित्तरंजनदास यांनी असहकाराचा ठराव ~~असहकार~~ ठराव मांडला. त्याला लाला लजपतराय यांनी अनुमोदन दिले. हि चळवळ स्वराज्य प्राप्ती करिता असून सत्य आणि अहिंसा यावर आधारित राहील हे गांधीजींनी स्पष्ट केले.

Page No.:
Date.:

5) असहकार चळवळीचा कार्यक्रम ⇒ असहकार चळवळीचा प्रस्ताव नागपूरच्या अधिवेशनामध्ये पास झाला. या प्रस्तावानुसार पुढील कृतीशील कार्यक्रम करण्याचे उद्दिष्टे ठेवण्यात आली.

1) सरकारी पदव्या त्याग करणे.
2) सरकारी नोकरी सोडून देणे.
3) शासकीय शाळामध्ये न शिकता राष्ट्रीय शिक्षण संस्थेत शिकणे.
4) शासकीय समारंभ बहिष्कार टाकणे.
5) शासकीय न्यायालयावर बहिष्कार टाकणे.
6) आपले वादविवाद पंचायती मार्फत सोडविणे.
7) विदेशी मालाचा बहिष्कार करणे.
8) स्वदेशीचा प्रचार व करता प्रसार करणे.
9) कायदेमंडळाच्या निवडणूकीवर बहिष्कार टाकणे.
10) भारतीय लष्कराने इंग्रजासाठी विदेशी भूमीवर लढण्यास जाऊ नये.
11) अस्पृश्यतेच्या निवारणाचे कार्य करावे.
12) हिंदू मुस्लिम एकतेचा प्रयत्न करावा.

Famous
Page No.:
Date.:

6) <u>असहकार चळवळीचा प्रसार</u> ⇒

असहकार चळवळी मुळे संपूर्ण भारतात जनतेतला पसरली. हजारो विद्यार्थांनी सरकारी शाळा सोडून राजकिय शाळामध्ये प्रवेश घेतला अनेक वकीलांनी सरकारी वकीलीची त्याग करून इंग्रज सरकारच्या असहकार केला यात मोतीलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्रप्रसाद, चित्तरंजन दास इत्यादींनी सरकारी वकीलीची त्याग केला. गांधीजींनी <u>कैसर - ए - हिंद</u> या पदवीचा सर रवींद्रनाथ टागोरांनी सर पदवीचा त्याग केला. अनेकांनी रायसाहेब, रायबहादूर या पदाच्या त्याग केला. विदेशी कपड्याच्या देशभर होळ्या जाळण्यात आल्या. परकीय मालावर बहिष्कार टाकण्यात आला. स्वदेशी खादी व चरखा यांना प्रोत्साहन देण्यात आले.

7) <u>चौरी - चौरा प्रकरण</u> ⇒

असहकाराची चळवळ प्रगती पथावर असतांना ही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न इंग्रजांनी केला. चळवळ करण्याच्या सुरुवात दांमले त्यांच्यावर लाठिमार केला. तेव्हा गांधीजींनी व्हाईसरायला पत्र पाठवून दडपशाही थांबविण्याची विनंती केली. जर दडपशाही थांबविली गेली नाही, तर आणखी सत्याग्रह केला जाईल असे इंग्रजांना कळविले होते. परंतु मध्यातच उत्तरप्रदेशातील चौरी चौरा या गावी 5 फेब्रुवारी 1922 ला हिंसक घटना घडली. लोकांनी काढलेल्या मिरवणूकीवर पोलीसांनी गोळीबार केली. संतप्त

संतापलेल्या जमावाने पोलीस चौकी जाळून टाकली. २० पोलीस व एक फौजदार जीवंत जाळले. या घटनेने अहिंसक चळवळीला काळीमा फासला असा आरोप करुन गांधीजींनी असहकार चळवळ मागे घेतली.

गांधीजींच्या या निर्णयावर मोतीलाल नेहरु, चित्तरंजन दास सुभाषचंद्र बोस यांनी टीका केली. अनेकांचा भ्रम निरास झाला.

8) <u>असहकार</u> <u>चळवळीचे</u> <u>महत्व</u> ⇒

या चळवळीला जरी अपयश लाभले असले तरी या चळवळीचे महत्व विसरता येत नाही.

1) असहकार चळवळीमुळे जनमानसात राजकीय जागृती आली.

2) काँग्रेसच्या ध्येय धोरणात बदल झाली

3) इंग्रजी सत्तेविरुध्दच जनआंदोलनास सुरुवात झाली.

4) बाहेरी भागातील काँग्रेस गावांमार्फत पोहोचली.

5) इंग्रज सरकार विषयी भीती लोकांच्या मनातून दुर झाले.

6) या चळवळीमुळे देशाला अहिंसा व सत्याग्रह यांची शिकवण मिळाली.

7) या चळवळीमुळे स्वतंत्रता आंदोलनाच्या राष्ट्रव्यापी स्वरुप प्राप्त झाली.

9) असहकार चळवळीचे परिणाम ⇒
चौरी-चौरा येथील हिंसेमुळे गांधीजींनी असहकार चळवळ मागे घेण्याच्या घेतलेल्या निर्णयावर मोतीलाल नेहरु चित्तरंजनदास, सुभाषचंद्र बोस आणि कठोर टीका केली. या चळवळीला अपयश आले असले तरी पुढील परिणाम झाल्याचे दिसून येते.

1) काँग्रेसच्या शहरापासून खेड्यापर्यंत विस्तार झाला.
2) सरकारी तुरुंगाची व पोलीसांची भीती दूर होऊन लाखो सदस्य काँग्रेसला प्राप्त झाले.
3) काँग्रेस नुसती ठराव करणारे संघटन नाही तर कृतीशील आहे हे स्पष्ट झाले.
4) काँग्रेसने या पुढे फक्त स्वराज्य हेच ध्येय ठरले.
5) या चळवळीमुळे स्वदेशी व राष्ट्रीय शिक्षणाला महत्व प्राप्त झाले.

## सविनय कायदेभंग चळवळ

nov46 सविनय कायदेभंगाच्या चळवळी विषयी माहिती द्या ?

प्रस्तावना

1919 च्या कौन्सील कायद्याच्या अंमल बजावणीची पाहणी करण्यासाठी दर दहा वर्षांनी एक समिती नियुक्ती करण्याची तरतुद करण्यात आली होती. या तरतुदीनुसार सर जॉन सायमन च्या नेतृत्वात एक समिती स्थापन करण्यात आली त्यात 7 सदस्य होते. भारताला जबाबदार शासन पध्दती देण्याचे ब्रिटिशांचे धोरण होते त्याकरिता सायमन कमिशन भारतात आले होते. या 7 सदस्यामध्ये एकही भारतीय नव्हता. भारताच्या भवितव्याचा विचार करणाऱ्या समीती भारतीय प्रतिनिधी नसल्याचे हे दुखदायी होते.

3 फेब्रुवारी 1928 ला मुंबई येथे सायमन कमिशनच्या विरोध करण्यात आला. देशभर सायमनला विरोध करण्यात आला. लाहोर येथील सायमन कमिशनच्या विरोधात काढलेल्या मोर्च्यावर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याने लाला लजपतराय गंभीर जखमी झाले व मृत पावले.

## नेहरू रिपोर्ट

भारतमंत्री बर्कनहेड यांनी भारतीयांना सर्वांना मान्य होईल अशा संविधानाचा मसुदा तयार करण्याचे आव्हान दिले. काँग्रेसने मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली. या समितीने जो आराखडा तयार केला त्यालाच नेहरू रिपोर्ट या नावाने ओळखले जातात. नेहरू रिपोर्टला मुस्लिम लीगने विरोध केला. व 14 सुत्री योजना सादर केली. काँग्रेसने ही चौदा सुत्री योजना अमान्य केली.

## संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव ⇒

29 डिसेंबर 1929 ला काँग्रेसचे अधिवेशन लाहोर येथे आयोजित केले होते. तेथील रावी नदीच्या काठावर काँग्रेसच्या वतीने संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव एकमुखाने पास करण्यात आला. गांधीजींनी संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मान्य केला. जवाहरलाल नेहरूंनी याच अधिवेशनात 26 जानेवारी 1930 हा स्वातंत्र्य दिवस राहिल अशी घोषणा केली.

## सविनय कायदेभंग चळवळ ⇒

गांधीजींना सरकारशी संघर्ष टाळण्यासाठी व्हॉईसराय कडे 11 मागण्यांचे पत्र व त्यावर लावलेला कर माफ करावा. राजकीय

त्याल दारूबंदी करावी, शेतसारा, मीठ, विदेशी माल व लष्करावर लावलेला कर माफ करावी, राजकीय कैद्यांची सुटका करावी, इत्यादी मागण्या केल्या. त्याकडे व्हाईसरॉयने दुर्लक्ष करून दडपशाही सुरु केली. याविरोधात गांधीजींना सविनय कायदेभंग चळवळ सुरु करण्याशिवाय पर्याय नव्हता.

इंग्रज सरकारच्या मिठावर आकारलेला कर विचारात घेऊन मिठाचा कायदा भंग करण्याचा निर्णय घेतला. याशिवाय सरकारी शिक्षण संस्था विदेशी माल यांचा बहिष्कार करावा असे ठरले.

## दांडी यात्रा =>

14 फेब्रु 1930 ला कॉंग्रेस वर्किंग कमेटीच्या सभेत गांधीजींच्या नेतृत्वाल मिठाचा कायदा मोडून कायदेभंग आंदोलन सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला. गांधीजींनी साबरमती आश्रमापासून दांडीपर्यंत पदयात्रा करण्याचा निर्णय घेतला. 12 मार्च 1930 ला निवडक 79 अनुयायी सोबत गांधीजीने पदयात्रा सुरु केली. त्या यात्रेत हजारो लोकांना भाग घेतला. 25 दिवसांनी हि यात्रा 6 एप्रिल 1930 ला दांडी येथे समुद्रकिनाऱ्यावरील मीठ उचलून गांधीजीने मिठाच्या कायद्याचा भंग केला. याचा परिणाम संपूर्ण भारतात सभा निदर्शने व हरताळ सुरु झाले. मिठाच्या व जंगलच्या कायद्याचा भंग देशभर

सुरु झाला.

सरकारने हि चळवळ दडपण्यासाठी लाठीमार केला. सत्याग्रहींची संपत्ती जप्त केली. 60,000 सत्याग्रहींना तुरुंगात डांबले. 5 मे 1930 ला गांधीजीं ना अटक केली.

## धारासना सत्याग्रह ⇒

गांधीजींना दांडी येथे मिठाच्या कायदा भंग करुन जी आंदोलन सुरु केले. त्याचे लोन देशभर पसरले. धारासना येथे कायदेभंग करण्याचे ठरले. सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांनी केले. 22 मे 1930 ला धारासना येथील मिठागारा जवळ कार्यकर्ते जमा झाले. पोलिसांनी त्यावर लाठीमार केला. तरीही कार्यकर्त्यांनी आपल्या निश्चयावर ठाम राहून कायदेभंग चळवळ सुरु ठेवली. तेव्हा इंग्रजांनी सरोजिनी नायडू यांना अटक करुन तुरुंगात डांबले.

## गांधी इरविन करार (5 मार्च 1931)

① पहिल्या गोलमेज परिषद इंग्रजांनी पास झालेले प्रस्ताव कॉंग्रेसने मान करावे. याकरिता कॉंग्रेसी नेत्यांची तुरुंगातून सुटका करावी.

② 5 मार्च 1931 ला सुप्रसिद्ध गांधी इरविन करार घडून आला.

③ राजकीय कैद्यांची सुटका करुन त्यांच्यावरील खटले मागे घ्यावे.

Scanned with CamScanner

④ सत्याग्रहींची जप्त केलेली संपत्ती परत करावी.
⑤ समुद्र काठावरील लोकांना निःशुल्क मीठ तयार करण्याची परवानगी द्यावी.
⑥ सत्याग्रहांना दारू, अफिम, आणि विदेशी कपड्यांच्या दुकानासमोर घातलेले विरोध अवैध करता यावा
⑦ सत्याग्रहांनी सोडलेल्या नोकऱ्यावर त्यांना परत द्यावे.

सरकारच्या वतीने खालील मागण्या सादर केल्या.

अ) काँग्रेसने कायदेभंगाची चळवळ मागे घेतली पाहिजे.

ब) विदेशी मालावरील बहिष्कार काँग्रेसने मागे घ्यावा.

क) दुसऱ्या गोलमेज परिषद काँग्रेसने भाग घ्यावा
या कराराने कायदेभंग चळवळ स्थगित झाल्या. भगतसिंह, राजगुरू, सुखदेव या क्रांतीकारकांना फाशी रद्द करावी. हि मागणी नसल्यामुळे अनेक जण नाराज झाले.

# IMP Que 4 Sem

1) असहकार चळवळ / भारत छोडो

2) सुभाषचंद्र बोस त्यांची कामगिरी आणि मांऊट बॅटन योजना

3) जहालवाद / होमरूल चळवळ

\#. टिपा लिहा

1) क्रिप्स मिशन  2) ~~क्र~~ कॅबिनेट मिशन

3) असहकार  4) सांप्रदायिकतेच्या उदय

5) भारत छोडो  6) 1947 च्या कायदा

7) आजाद हिंद सेना  8) दादाभाई नौरोजी

9) टिळक

Scanned with CamScanner

Famous Page No.: Date.:

दुसरी गोलमेज परिषद ⇒ लॉर्ड आयर्विन यांनी गोलमेज परिषदेसाठी एकूण ७५ प्रतिनिधींची निवड केली. जात, धर्म, वंश, व संस्थानिक अशा विविध घटकांच्या लोकांचा सहभाग होता. पहिल्या गोलमेज परिषदेत वसाहतीचे स्वराज्य जबाबदार राज्यपद्धती आणि भारतीय संघराज्य स्थापन करण्याची मागणी करण्यात आली होती. धार्मिक अल्पसंख्याकांच्या मागण्यावर विचार करण्यासाठी रॅमसे मॅगनेमार यांच्या नेतृत्वात जाती निवारण समिती स्थापन करण्यात आली. या परिषदेत सिख आणि अस्पृश्यांना स्वातंत्र्य मतदार संघ देण्यात आले.

दुसऱ्या गोलमेज परिषदेत कॉंग्रेसच्या वतीने गांधीजींनी उपस्थिती दिली. 7 सप्टेंबर 1931 सुरु झाली. अस्पृश्यांना मिळालेल्या स्वातंत्र्य मतदार संघाच्या विरोधात गांधीजींनी प्राणांतिक उपोषण करुन विरोध केला. 11 सप्टेंबर 1931 ला दुसरी गोलमेज परिषद समाप्त झाली.

* कायदेभंग चळवळीचे दुसरे पराभव

1 जानेवारी 1932 ला कायदेभंगाची चळवळ पुन्हा सुरु करण्याचे निर्णय घेण्यात आले. इंग्रजांनी 4 जानेवारी 1932 ला गांधीजी यांना येरवडा जेल मध्ये कैद

केले. बापूच्याची कायदेभंगाची चळवळ चिरडून टाकण्याच्या हेतूने पोलिसांनी विशेष अधिकार देण्यात आले. ६ आठवड्यामध्ये आम्ही ही चळवळ मोडून काढून असे व्हॉईसरॉयने घोषित केले; परंतू त्याच्या भ्रमनिरास झाला; उलट नेत्यांना तुरुंगात डांबल्यामुळे कायदेभंग चळवळी विशाल रूप धारण केले.

पुणेकरात जातिनिवारणाच्या माध्यमातून हिंदू समाजात फूट पाडण्याच्या प्रयत्न

इंग्रजांनी हे करताच गांधीजींनी या विरोधात आमरण अनशनाच्या निर्णय जाहीर केला. गांधीजींच्या उपोषणामुळे अनेक कॉंग्रेसचे नेते अस्पृश्य नेत्याचे तडजोडीची बोलणी करू लागली. अखेर २५ सप्टेंबर 1932 ला डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघ आणि दुहेरी मतदानाच्या अधिकार सोडला व गांधीजींसी पुणेकराला व

सविनय कायदेभंगाचे मूल्यमापन =>

7 एप्रिल 1934 ला गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ समाप्त केली. या घोषणेवरोवर सविनय कायदेभंग चळवळ समाप्त झाली. या आंदोलनामुळे गावातील जनता निर्भीड झाली. कॉंग्रेस गावात पोहोचली. या स्त्रियांनी उत्स्फूर्त भाग घेतला. त्यांनी लाठीमार सहन केला. या चळवळीत ब्रिटिशांच्या अत्याचारांना लाठी हल्ल्यांना गोळीबारांना लोकांनी हल्ल्यांना तोंड दिले. सरोजिनी नायडू यांनी धराराचे नेतृत्व दिले. हा भारताच्या मानसिक मुक्तीचा व देशप्रेमाच्या अपूर्व आविष्कार होता. या चळवळीचा परिणाम इंग्रजांना १९३५ चा कायदा पास करावा लागला.

# भारत छोडो / चले जाव चळवळ

* भारत छोडो किंवा चले जाव चळवळ विषयी माहिती द्या ?

⇒ **प्रस्तावना** ⇒

1 सप्टेंबर 1939 ला द्वितीय महायुद्ध सुरु झाले. इंग्रजांनी भारतीयांची संमती न घेता भारताला इंग्लंडच्या बाजुने युद्धात झोकुन दिले. कॉंग्रेसने या विरोधात राजीनामा व राजीनामे दिले. 1940 च्या मुस्लिम लीगच्या अधिवेशन स्वतंत्र राष्ट्राची मागणी करण्यात आली. 1942 ला भारतीयांचे सहकार्य मिळविण्यासाठी क्रिप्स मिशन भारतात पाठविण्यात आले. क्रिप्सने जी योजना जाहिर केली. ती भारतातल्या विविध जात, धर्म, पंथाच्या सदस्यांनी फेटाळून लावले. जपान सरकारच्या मदतीने सुभाषबाबूंनी जी आजाद हिंद सेना स्थापन केली होती. त्या सेनेने भारतातील इंग्रजांना हुसकावून लावण्यासाठी पूर्व भारतात दाखल झाले होते. सुभाषबाबूंनी चलो दिल्ली असा नारा देवून भारतीयांना सहकार्य करण्याची विनंती केली होती. 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आजादी दूंगा' असे स्वातंत्र्याचे वचनही सुभाषबाबूंनी भारतीयांना दिली. सुभाषबाबूंच्या भारतीयांचे सहकार्य मिळाल्यास भारतातून इंग्रज जावून भारत जापानच्या प्रभावाखाली जावू शकतो. त्यामुळे गांधीजींनी वरील सर्व कारणांची प्रतिक्रिया म्हणून 26 एप्रिल 1942 च्या हरिजन साप्ताहिकात आम्ही काहिही झाले तरी चालेल, परंतु ब्रिटिशांनी भारत सोडून निघून जावे असे मत व्यक्त केले.

## वर्धा ठराव ⇒

६ जुलै ते १४ जुलै १९४२ या काळात काँग्रेस कार्यकारिणीची बैठक वर्धा येथे घेण्यात आली. त्यात झालेल्या विचार विनिमया अंती १४ जुलै १९४२ ला काँग्रेसच्या कार्यकारणीने ब्रिटिशांनी भारत सोडुन निघून जावे. असा ठराव पारित केला. या ठरावात ① एक भारतात इंग्रजी सत्ता भारतीयांकरिता अपमानास्पद आहे. या सत्तेने भारताला कमजोर / खिळखिळे केले आहे.

② भारताला जर स्वातंत्र्य मिळावे तर जनसंख्या आबा वाढेल.

③ इंग्रज भारतातून निघून गेल्यास भारत इंग्रजांची युद्धास मदत करेल.

④ इंग्रजांनी भारत सोडल्यास हंगामी सरकारची स्थापना होईल.

⑤ सरकारने हा ठराव स्विकारला नाही. तर काँग्रेस स्वातंत्र्याची चळवळ सुरु करेल.

## भारत छोडोचा ठराव / प्रस्ताव

वर्धा येथील पारित झालेल्या प्रस्तावाला ७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे आयोजित अधिवेशनात मौलाना आजाद यांनी ठरावाची पार्श्वभूमी सांगितली तर जवाहरलाल नेहरू यांनी वर्धा ठराव मांडला. तर सरदार पटेल यांनी अनुमोदन

Page No.:
Date.:

केले. गांधीजी म्हणाले, आम्हाला ताबडतोब स्वातंत्र्य पाहिजे. त्या साठी लढू किंवा मरण पत्करू असा कार्यकर्त्यांना मंत्र दिला. ८ ऑगस्ट १९४२ ला वर्धा ठराव बहुमताने पास झाला.

या ठरावात

① इंग्रजांनी भारताचे आर्थिक शोषण केले असल्याने त्वरित सत्तेचे उच्चाटन करणे.

② ब्रिटिश निघून गेल्यावर स्थापित करावयाच्या शासन व्यवस्थेची रूपरेषा ठरविणे.

③ महायुद्ध काळात दोन राष्ट्रांना मदतीचे राष्ट्रांना मदतीचे आश्वासन दिले

④ जागतिक शांती करिता निःशस्त्रीकरणास समर्थन देणे.

⑤ कॉंग्रेसने स्वातंत्र्याची मागणी केली आहे. त्यासाठी कॉंग्रेस चळवळ सुरु करत आहे. हे ठराव मांडण्यात आहे.

Scanned with CamScanner